प्रेसनोट दिनांक – २४/०७/२०१७

------------------------------

## खंडणी बहाददर नामचीन गुंड अब्दुल गनी खान टोळी मोक्का अंतर्गत जेरबंद

मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी पुणे शहर परिसरातील अस्तित्वात व कार्यरत असलेल्या गुन्हेगारी टोळयांचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

श्रीमती नजमा इसाक शेख वय – ६४ रा - ३०७ घोरपडे पेठ, शबिस्तान सोसायटी प्लॅट नं. ८ गॅलेक्सी बिल्डींग पुणे या वयोवृध्द महिलेचा त्यांचे घराजवळच चायनीज खादयपदार्थ विक्रीचा व्यवसाय आहे. त्यांचेकडे सहा महीन्यांपासुन अब्दुल गनी खान व त्याचे साथीदार अक्षय नाईक, अक्रम पठाण अक्षय माने हे त्यांचे व्यवसायाचे ठिकाणी येवुन फुकट चायनीज जेवण घेवुन जात होते. फिर्यादी यांचा मुलगा मन्सुर याने त्यांना फुकट जेवण देण्यास नकार दिल्याने अब्दुल गनी खान व त्याचे साथीदार यांनी मन्सुर यास खलास करण्याची व चायनीज पदार्थात विष कालवण्याची धमकी दिली होती व गेले सहा महीन्यापासुन त्यांचेकडुन दर महीना दोन हजार रुपये हप्ता चालु केला होता. दिनांक - ०२/०६/२०१७ रोजी रात्रौ २२.०० वा. सुमारास नजमा इसाक शेख व त्यांचा मुलगा मन्सुर असे हातगाडीवर चायनीज पदार्थाची विक्री करीत असताना अब्दुल गनी खान हा त्याचे साथीदार अक्षय नाईक, अक्रम पठाण, अक्षय माने यांचेसह आला व त्यांनी मन्सुर यास " ए मन्सुर चल इस महीनेमे ईद है तुझे तीन हजार रुपये वर्गणी और महीनेका हप्ता दोन हजार रुपये ऐसे सब मिलाकर पास हजार रुपये देना पडेगा " असे धमकावले त्यास त्यांनी नकार दिल्यामुळे त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी देवुन त्यांचेकडुन पाच हजार रुपये घेतले त्याबाबत नजमा इसाक शेख यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे.

श्री इम्रान अफजल शेख वय - ३४ वर्षे रा - ३०४ घोरपडे पेठ पुणे. यांचा नटराज ग्लास डिझायनिंग नावाने काचेवर नक्षीकाम करुन देण्याचा कारखाना आहे. त्यांचेकडे अब्दुल गनी खान व अक्षय राजेश नाईक यांनी पंचवीस हजार रुपयाची मागणी केली ते दिले नाही त्याकारणावरुन त्यांनी दिनांक २०/६/२०१७ रोजी सायंकाळी १६.०० वा. चे सुमारास इम्रान अफजल शेख हे मोपेड नंबर एमएच १२ एई/२०२२ वरुन घरी जात असताना धोबीघाट बोहरी कब्रस्थान जवळुन जात त्यांना लोखंडी गजाने व फरशीने मारहाण करुन त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री मेहबुब हुसेन अल्लाना वय - ४५, रा. २३२ घोरपडे पेठ बोहरी कब्रस्थान समोर पुणे या व्यापाऱ्याचे भावाचे अपहरण करुन त्यांना डांबुन ठेवुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन अब्दुल गनी खान व त्यांचे साथीदार यांना त्यांचेकडुन पन्नास हजार रुपये खंडणी घेतली आहे.

श्रीमती लता ताटे वय – ३८ रा - २३२ घोरपडे पेठ पुणे व सध्या फिर्यादी या बी / ४२८ लेक टाउन एसआरए बिल्डींग पुणे. यांचे पतीचे निधन झालेनंतर त्यांना मुलीचे शिक्षणासाठी पैशाची आवश्यकता भासल्याने त्यांनी अब्दुल गनी याचे आईकडुन व्याजाने पैसे घेतले होते ते परत दिले नाही म्हणुन त्याने व त्याचे साथीदार अक्षय नाईक, अक्षय माने, अक्रम पठाण यांनी त्यांना धमकावुन त्यांचे घर बळकावण्याचा प्रयत्न केला आहे.

अब्दुल गनी खान याने त्याचे नेतृत्वाखाली स्वतःचे टोळीचे वर्चस्व निर्माण करुन, त्यातुन परिसरात दहशत निर्माण करुन, त्याव्दारे अवैध आर्थिक फायदा मिळवला आहे. १) अब्दुल गनी खान,वय-३४ रा.२३२ घोरपडे पेठ २) अक्षय रोजश नाईक,वय २८ रा - १६४ घोरपउे पेठ पुणे ३) अक्रम नासीर पठाण, २७, रा - औंध डीपी रोड मेडीपाईन्ट हॉस्पीटल जवळ फ्लॅट नं. २/ई/२ पुणे. ४) अक्षय अंकुश माने वय - २३ रा - ६३८ घोरपडे पेठ पुणे यांना पोलीसांनी अटक केली आहे व ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. अब्दुल गनी खान याने सन २००४ पासुन स्वतःची संघटीत टोळी तयार करुन प्रत्येक वेळी वेगवेगळे साथीदारांना बरोबर घेवुन त्यांचेसह खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, मारामारी यासारखे गंभीर स्वरुपाचे एकुण दहा गुन्हे केलेले आहेत. त्यास सन २०१२ मध्ये दोन वर्षाकरिता पुणे शहर व जिल्हयातुन तडीपार करण्यात आले होते. अक्षय नाईक याचेविरुध्द खंडणी, खुनाचा प्रयत्न, दुखापत यासारखे गंभीर

स्वरुपाचे चार गुन्हे त्याला सन २०१२ मध्ये दोन वर्षाकरिता पुणे शहर व जिल्हयातुन तडीपार करण्यात आले होते. अक्रम पठाण याचेविरुध्द खंडणी , घरफोडी , चोरीचा माल घेणे असे चार गुन्हे व अक्षय माने याचेविरुध्द खंडणी, गंभीर दुखापत, दरोडयाची तयारी, मारामारी व चोरी असे नऊ गुन्हे दाखल आहेत.

अशाप्रकारे त्यांनी संघटीतरित्या गुन्हे केल्याचे आढळुन आल्याने त्यांचेविरुध्द मोका कायदा अंतर्गत कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव मा. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) खडक पोलीस स्टेशन पुणे व तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड, पोलस कर्मचारी सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे, अनिकेत बाबर यांनी प्रस्ताव तयार केला व तो मा. रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांचेकडे पाठविला होता त्यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(२), ३(४) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यानुसार सर्व आरोपीविरुध्द मोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे गुन्हयांचा पुढील तपास शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री बाजीराव मोहीते हे करत आहेत.